


दैनिक
निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३९७ मंगळवार दि २३ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# नाशिकमध्ये भाजपकडून कुस्ती, साताऱ्यात मात्र शिवसेनेची दोस्ती, झेडपीतील गोंधळानंतरही युती निभावली...

**वृत्तसंस्था-सातारा**

विधान परिषद निवडणुकीत भाजपची दुहेरी चाल समोर आली आहे. नाशिकमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उमेदवाराचा भाजपने करेक्ट कार्यक्रम केला, तर सांगली-सातारा मतदार संघातील अडचणीत असलेल्या आपल्या उमेदवाराला भाजपने निवडून आणले. भाजपने महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेवर केलेल्या या कुरघोडीचे भविष्यात काय पडसाद उमटतात, हे पाहणे आता रंजक ठरणार आहे. नाशिक विधान परिषद निवडणुकीत महायुतीतील भाजपकडे १८८, शिवसेनेकडे १७१ तर राष्ट्रवादीकडे १०७, असे ४६६ संख्याबळ असतानाही शिवसेनेचे नरेंद्र दराडे यांना केवळ २४८ मते पडली. या उलट भाजप बंडखोर अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांना तब्बल ३५७ मते मिळाली. त्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादीची मते फुटल्याचे स्पष्ट झाले. त्यातही भाजपची सर्वाधिक मते फुटल्याचे बोलले जात आहे. त्यातही आम्ही गोकुळ गितेंना मदत करून निवडून आणल्याचा दावा शिवसेना उबाठाने केला आहे. नाशिकमधील या निकालानंतर महायुतीत खळबळ उडाली आहे.

सांगली-सातारा विधान परिषद निवडणुकीत भाजप उमेदवार धैर्यशील कदम यांच्या समोर आव्हान होते. सातारा जिल्हा परिषद सत्ता स्थापनेवेळी झालेल्या राड्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मतदार दगाफटका करण्याची भीती होती. शिवसेनेचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री मकरंद पाटील यांनी शेवटपर्यंत ताठर भूमिका घेतली होती. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. भाजप नेत्यांना धोक्याची चाहूल लागताच भाजपकडून डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न झाला. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांची एकत्रित बैठक झाल्यानंतर शंभूराज देसाई आणि मकरंद पाटील यांनी मतदारांना महायुतीच्या उमेदवाराला मतदान करण्याचे आदेश दिले. त्यामुळे भाजपचे उमेदवार धैर्यशील कदम पहिल्या पसंतीची मते मिळवून विजयी होऊ शकले. मात्र, नाशिकमध्ये शिवसेनेचे उमेदवार नरेंद्र दराडे पराभूत झाले. त्याठिकाणी भाजपचे बंडखोर गोकुळ गिते विजयी झाले. शिवसेना उबाठा गटाची गितेंना मदत झालीच, पण भाजपच्या मतदारांनीही गितेंनाच साथ दिल्याचे उघड झाले आहे.



विधान परिषद निवडणुकीत महायुतीची मते फुटल्याबद्दल मंत्री जयकुमार गोरे यांनी खोचक प्रतिक्रिया देत नाव न घेता शिवसेना नेते, पालकमंत्री शंभूराज देसाई आणि मकरंद पाटील यांच्यावर निशाणा साधला. धैर्यशील कदम यांना किती मते पडायला पाहिजे होती, कोणी मते दिली नाहीत, काय घडले, याचा आम्ही नक्कीच हिशोब करू. हिशोब करण्यात आम्ही पक्के आहोत. पालकमंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांनी काय केले ते देवाला माहिती, असा टोला जयकुमार गोरे यांनी नाव न घेता लगावला. अनेकांची गणिते वेगवेगळी होती. अनेकांच्या मनात एक, ओठात एक आणि करणीत वेगळे होते, अशा शब्दांत गोरे यांनी मत फुटीचा अप्रत्यक्षपणे ठपका शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांवर ठेवला.

# चौथा संजयही धक्का देणार? ठाकरेंच्या तातडीच्या बैठकीला गैरहजर राहिल्याने चर्चा; आता चौघांच्या अनुपस्थितीवर स्पष्टीकरण...

**मुंबई**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांना साथ दिल्याच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी पक्षाच्या सर्व आमदारांची तातडीची बैठक बोलवली होती. यात पावसाळी अधिवेशनाकरिता रणनीती आखतानाच सहा बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांतील आढावा घेण्यात आल्याचे कळते. दरम्यान, पक्षप्रमुखांनी बोलावलेल्या या बैठकीला चार आमदार अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली. मात्र, या बैठकीनंतर सर्व आमदार पक्षाशी एकनिष्ठ असल्याचा दावा नेते मंडळींकडून करण्यात आला.

सहा फुटीर खासदारांपैकी संजय जाधव, संजय देशमुख आणि संजय दिना पाटील अशी तीन संजयनंतर आता आमदार संजय पोतनीसही आमदारांच्या या बैठकीला गैरहजर राहिल्याने चर्चेला तोंड फुटले होते. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. त्यातच पक्षातील सहा खासदारांनी वेगळी वाट धरल्याने पक्षाला जोरदार धक्का बसला आहे. त्यामुळे शिवसेना (उबाठा) पक्षाचे सर्व प्रमुख नेते आाणि सर्व आमदारांची बैठक पक्षाच्या नरिमन पाइंट येथील ‌ङ्गशिवालयफ येथे आयोजित करण्यात आली होती. आगामी पावसाळी अधिवेशनातील रणनीती, सरकारविरोधातील मुद्दे आणि संघटनात्मक बांधणीवर या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. तसेच, पक्ष सोडून गेलेल्या खासदारांविरोधात राजकीय लढा अधिक आक्रमकपणे लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. उद्धव ठाकरे स्वतः बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांचा दौरा करणार असल्याचे संकेतही बैठकीत देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. संजय पोतनीस , राहुल पाटील, संजय दरेकर आणि गावी असलेले सुनील शिंदे हे आमदार बैठकीला उपस्थित नव्हते. खासदार फुटल्यानंतर लगेचच या आमदारांची अनुपस्थिती राजकीयदृष्ट्या नव्या चर्चेचा विषय ठरला. मात्र, पक्ष एकसंध असून सर्व आमदार ठामपणे उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभे



असल्याचा दावा बैठकीनंतर करण्यात आला. दरम्यान, शिवसेनेच्या ऑपरेशन टायगरफच्या चर्चांमुळे ठाकरे गटावर दबाव वाढला आहे. त्यामुळे शिवालय येथील बैठक ही केवळ अधिवेशनपूर्व आढावा बैठक नसून, पक्षातील निष्ठा आणि संघटनात्मक ताकद तपासण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# बदलती संस्कृती अन् कौशल्य

शिवसेनेचा साठावा वर्धापन दिन दोन्ही शिवसेनांनी सालाबादाप्रमाणे साजरा केला. यात उद्धव ठाकरे यांच्या मेळाव्यावर सहा खासदारांच्या फुटीचे सावट होते. उद्धव या फुटीवरून निर्वाणीचे बोलले. ङ्गमाझ्यावर तुमचा विश्वास नसेल शिवसेना पक्षप्रमुखपद मी सोडतो. एखाद्या नव्या दमाच्या सामान्य शिवसैनिकाकडे हे पद द्या,फ असे आवाहनही त्यांनी केले. शिवसैनिक हा भावनिक असतो. नेत्याच्या आदेशावर जीव ओवाळून टाकणारा असतो. अशा तरुणांचेच संघटन बाळासाहेब ठाकरे यांनी साठ वर्षांपूर्वी उभे केले. त्यामुळे बाळासाहेबांच्या हयातीत छगन भुजबळ, गणेश नाईक, राज ठाकरे, नारायण राणे आदी नेत्यांची बंडखोरी झाली तरी त्या घटना सरळपणे झाल्या नव्हत्या. शिवसैनिकांचा रोष त्यांना सहन करावा लागला होता. आता ती परिस्थिती नाही. षण्मुखानंद सभागृहात उद्धव यांनी उपस्थितांना भावनिक आवाहन केले. केंद्रातील सत्तेच्या जीवावर फोडाफोडीचे जे राजकारण सुरू आहे, त्याच्यासमोर उभे राहावे लागेल, ऑपरेशन कमळ राबवावे लागेल, असा जोश उपस्थितांमध्ये भरू पाहिला; मात्र त्याचा परिणाम किती होईल हा मोठाच प्रश्न आहे. त्याच वेळी गोरेगावच्या नेस्को येथे एकनाथ शिंदे त्यांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला थेट आव्हान देत होते. ङ्गवाघ एकटा येतो, कुत्री भुंकतातफ वगैरे ते उबाठाला डिवचत होते. सहा खासदारांच्या फुटीबाबत शिंदे यांनी मेळाव्यात थेट काहीही बोलणे टाळले. मात्र, ङ्गये तो ट्रेलर है पिक्चर अभी बाकी हैफ असे म्हणत शिवसेना (उबाठा) पक्षात केवळ उभी नाही; तर सगळ्याच बाजूंनी जोरदार फूट घडवणार, असा शिवसेना संस्कृतीतला आवाज त्यांनी उद्धव यांना दिला आहे.

सिनेमात राजेश खन्नाचा काळ जाऊन अमिताभ बच्चन हीरो होण्याच्या काळात शिवसेनेला बहर आला. कामगारांच्या वस्त्यांमध्ये बेकार तरुणांचे लोंढेही वाढू लागले. छोट्या मोठ्या कारणांवरून होणाऱ्या मारामाऱ्या हे मुंबईच्या लालबाग, परळ, घोडपदेव वगैरे विभागाचे वैशिष्ट्य. मारामारी सुरू होण्यापूर्वी तरुणांचा घोळका दुसऱ्या घोळक्यासमोर जाऊन ङ्गआव्वाजफ असे ओरडून आव्हान देत असे. बाळासाहेबांना इथल्या ङ्गलुम्पेन प्रॉलितरिएतफची भाषा चांगली अवगत होती. त्याचीच त्यांनी घोषणा केली. अमिताभ स्टाईल ङ्गतिथल्या तिथे न्यायफ हे सेनेचे सूत्र होते. त्यामुळे शिवसेना तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाली. बाळासाहेब हे एकमेव नेते व त्यांचा आदेश म्हणजे अंतिम. त्या आदेशाबाबत विवेकाने विचार वगैरे अशक्य. शिवसेनेच्या जन्मापासून उद्धव ठाकरे हे त्याचे साक्षीदार असले तरी त्यांची सांस्कृतिक जडणघडण सामान्य शिवसैनिकाप्रमाणे झालेली नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. नव्या आर्थिक धोरणामुळे अर्थकारणाबरोबरच समाजाची सांस्कृतिक वीण पूर्णपणे बदलून गेली. राजकारणात पैशाचे महत्त्व अतोनात वाढले. आता केवळ नेतेच नाही तर कार्यकर्तेही व्यावसायिक विचार करू लागले आहेत. एकनाथ शिंदे यांच्या यशाचे मोजमाप करताना या बाबीही लक्षात घ्याव्या लागतील. जनतेचे प्रश्न सोडवणे म्हणजे बहुतांश वेळा रोख रक्कम देऊन जनतेला नमस्कार करणे हे सोपे उत्तर काळानुरूप लोकप्रतिनिधींनी शोधले आहे. पैशांची सोय करण्याच्या विवंचनेत लोकप्रतिनिधी कायम असतात. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजीव गांधी यांनी १९८५ साली जो पक्षांतर बंदी कायदा आणला त्याबाबत ज्येष्ठ समाजवादी नेते व विचारवंत मधू लिमये यांचा जो आक्षेप होता, त्यातही या फुटीचे



कारण लपलेले आहे. या कायद्यानंतर संसद वा विधिमंडळातील प्रतिनिधी वैयक्तिक विवेकाला जागू शकणार नाहीत, ते पक्षप्रमुखाने नेमलेल्या व्हिपचे गुलाम होतील व त्यांची वैधता पूर्णपणे अध्यक्षाच्या हातात जाईल, हे लिमयेंचे म्हणणे तंतोतंत खरे ठरले. पक्षांतर्गत लोकशाहीचा ऱ्हास व पैसा हेच लोकांचे प्रश्न सोडवण्याचे माध्यम झाल्याने संसदीय पक्षातील दोन तृतीयांश सदस्य फुटण्याचा अडथळाही सहज पार होऊ लागला. त्यात न्यायालयानेही संघटनेतील फुटीपेक्षा संसदीय पक्षातील फूटच ग्राह्य मानल्याने छोट्या पक्षांची मोठीच पंचाईत झालेली आहे. एकूणात शिवसेना उबाठाचे खासदार फुटल्याने माध्यमांमधील चर्चांपलीकडे राजकीय पाण्यावर तरंग उमटण्याची शक्यता कमीच. आवाज देण्याची क्षमता दोन्ही बाजूंनी गमावल्यासारखीच आहे. घाऊक संख्येने फोडण्याची व फुटून निघण्याची क्षमता हे मात्र लोकप्रतिनिधींनी आत्मसात केलेले नवे कौशल्य आहे, हे मात्र मान्य करावेच लागेल.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या चर्चेवर ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया; निंबाळकरांच्या विधानाचाही समाचार

**मुंबई/वृत्तसंस्था**

शिवसेनेच्या हिरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त दोन्ही गटांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत मेळावे घेतले. शिवसेनेच्या (ठाकरे) सहा खासदारांनी बंडखोरीचे संकेत दिल्यामुळे यंदाच्या वर्धापनदिनाला वेगळेच वलय निर्माण झाले होते. दोन्ही गट एकमेकांवर काय टीका-टिप्पणी करतात, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. त्यातच ठाकरे गट काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची चर्चा सुरू होती. त्यावर उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

काँग्रेसमध्ये विलीनीकरणाच्या चर्चेबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, "शिवसेना विलीन होण्यासाठी आलेली नाही. तर मराठी माणसाच्या आणि हिंदुत्वाच्या न्याय हक्कासाठी आणि रक्षणासाठी जन्माला आलेली आहे. काँग्रेसनेही आपल्याला छळलेच होते. आपले अर्ध्याहून अधिक आयुष्य काँग्रेसबरोबरच्या शत्रुत्वात गेले आहे. आपले टोकाचे वैर होते."

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला शिवसेनेच्या ६० वर्षातील प्रवासात ज्यांनी ज्यांनी योगदान दिले, त्यांचे स्मरण केले. ते म्हणाले, "शिवसेनेसाठी अनेकांनी बलिदान दिले, तुरुंगवास भोगला, रक्ताचे पाणी केले. त्यातले काही जण आज आपल्यात आहेत, काही जण नाहीत. त्या सर्वांना मी विनम्र अभिवादन करतो. शिवसेनाप्रमुखांसह जी पहिली फळी होती, त्यांनी घेतलेल्या कष्टामुळेच शिवसेना कानाकोपऱ्यात पसरली."

शिवसेनेच्या आजवरच्या वाटचालीत अनेक संकटे आली. आज आलेले संकट त्यासमोर काहीच नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. "ज्यावेळी आपण आपल्या यश-अपयशाची तुलना निवडणुकीच्या निकालाशी



करायला लागलो, त्यावेळी आपण फसलो", असे विधान यावेळी उद्धव ठाकरे यांनी केले. उद्धव ठाकरे यांनी आणीबाणीच्या काळातील आठवण सांगताना रजनी पटेल यांचा किस्सा सांगितला. त्यावेळी रजनी पटेल शिवसेनेच्या मुळावर उठले होते. त्यांनी शिवसेनाप्रमुखांना एक पत्र देऊन त्यावर स्वाक्षरी करण्याची धमकी दिली होती. शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन करा, अशा आशयाचे ते पत्र होते. आजही काही जण बोंबलत आहेत की, शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होणार. पण आम्ही ३० वर्ष भाजपाबरोबर राहून भाजपात विलीन नाही झालो. तर काँग्रेसमध्ये कोण विलीन होणार? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला.

शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा विषय साफ चुकीचा असल्याचे उद्धव ठाकरेंनी ठणकावून सांगितले. उलट भाजपाच आता शिंदे सेनेत सामील होईल, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे ठाकरे म्हणाले. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी एका वृत्तपत्राला मुलाखत देताना ठाकरे गट सोडण्याचे कारण सांगितले. उद्धव ठाकरे प्रचारासाठी प्रकृती ठिक नसल्याने येत नाहीत. पण निदान आदित्य ठाकरेंनी तरी फिरायला हवे, असे निंबाळकर म्हणाले. या विधानावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, "मी भेटत नाही, फिरत नाही, असे म्हटले गेले. मग मी जर प्रचाराला येत नव्हतो, तर तू (निंबाळकर) निवडून कसा आलास? लोकसभेच्या प्रचारासाठी मी प्रत्येक मतदारसंघात अनेक सभा घेतल्या होत्या. तेव्हा हे लोक निवडून आले."

शिवसेनेचे (ठाकरे) सहा खासदार फोडून शिंदे गटात जाणार असल्याची चर्चा आहे. याला 'ऑपरेशन टायगर' असे नाव दिल्याचे बोलले जात आहे. यावर उद्धव ठाकरे यांनी सडकून टीका केली. "ज्या पद्धतीने देशाचे राजकारण चालले आहे जनतेचा विश्वास उडत चालला आहे. सोशल मीडियावर एक मिम व्हायरल होत आहे. सोने चोराला पोलिसांनी पकडल्यानंतर तो सांगतो साहेब चोरी म्हणू नका, 'ऑपरेशन गोल्ड' म्हणा. डॉक्टरही आता गोंधळलेत की आपण चोरी करतोय की ऑपरेशन करतोय. हे असे होणार असेल तर तुम्हाला आणि आपल्याला सगळ्यांना मिळून 'ऑपरेशन कमळ' करावs लागेल. देश अराजकाच्या दिशेने चालला आहे", असा संताप उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला.

## "ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है!" शिवसेनेच्या वर्धापनदिनी एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना मोठा इशारा

**परभणी/वृत्तसंस्था**

राज्यात 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार फोडण्यात आल्याची चर्चा आहे. याबाबत अद्याप अधिकृत शिक्कामोर्तब झाले नसले, तरीही हा फुटीर गट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील होणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर सभेत विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. ते शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त गोरेगाव येथे आयोजित मेळाव्यात बोलत होते.



"एकनाथ शिंदे काय बोलणार? व्यासपीठावर कोण कोण येणार? काय होणार? असे सवाल उपस्थित केले जात होते. अरे, आज ये टायगर आपके सामने खडा है! आज मी बघतोय, काल-परवापासून कुछ कुत्ते रोज भोंक रहे है; पण मी तुम्हाला सांगतो, कुत्ते झुंड में आके भोंकते है, शेर अकेला आता है!" अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर'चा थेट उल्लेख न करता विरोधकांचा समाचार घेतला.

ते पुढे म्हणाले, "कुत्ते भोंकते रहते है, टायगर शिकार करता है! कुत्ते भोंकते रहते है और टायगर दहाडता है! ही खरी शिवसेना आहे. आज महाराष्ट्रात आपण पाहत आहोत की, वंदनीय बाळासाहेबांचे आणि धर्मवीरांचे विचार घेऊनच आपण पुढे जात आहोत. ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है!" असं म्हणत त्यांनी ठाकरेंचे आणखी नेते फोडण्याचे संकेत दिले. "शिवसेनेचा जन्म मराठी माणसाच्या स्वाभिमानासाठी झाला असून, या माध्यमातून महाराष्ट्राच्या अस्मितेची मोठी चळवळ उभी राहिली. मराठीचा निर्धार, देशद्रोह्यांवर प्रहार, लाडक्या बहिणींचा स्वाभिमान, शेतकऱ्यांचा तारणहार आणि वारकऱ्यांचा जयजयकार म्हणजे शिवसेना!" अशा घणाघाती शब्दांत त्यांनी उपस्थितांमध्ये स्फुल्लिंग चेतवले.

"मी डॉक्टर नसलो, तरीही अजूनही ऑपरेशन करतो आणि ऑपरेशन करायला वाघाचं काळीज लागतं, लांडग्याचं नाही. लांडग्याचं कातडं पांघरून वाघ होता येत नाही", असं म्हणत त्यांनी ठाकरेंवर बोचरी टीका केली.

"४ वर्षांपूर्वी याच लांडग्यांनी मला धमक्या दिल्या होत्या. मुंबईत तर यावंच लागेल. एकनाथ शिंदे एकटा आला, एअरपोर्टवरून हेलिकॉप्टर बाजूला ठेवलं. हेलिकॉप्टरमध्ये एकनाथ शिंदे बसला नाही. गाडीत बसला, बायरोड गेला, वरळीतून गेला, वरळीत थांबला. तेव्हा हे धमक्या देणारे घरामध्ये ऑनलाईन बघत होते. आम्हाला काय चॅलेंज देणार. आता म्हणतात हिंमत असेल तर समोर या. रामदासभाई तर बोलले की तुडवायला हे शिवसैनिक पाय जागेवर ठेवतील का? तुडवायला पाय लागतात. हे शिवसैनिक आहेत, कडव्या बाळासाहेबांच्या विचारांचे आहेत", असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

## रामदास कदमांचा राऊतांना इशारा, एकनाथ शिंदेंना म्हटले 'खरे टायगर

**मुंबई/वृत्तसंस्था**

शिवसेनेच्या वर्धापन दिनी शिंदेसेनेच्या नेत्यांनी जोरदार फटकेबाजी करताना उबाठा गटाच्या संजय राऊतांवर टीका केली. "आमच्या अंगावर आला तर शिंगावर घेतल्याशिवाय राहणार नाही," असा इशारा शिवसेना नेते आणि माजी मंत्री रामदास कदम यांनी संजय राऊतांना दिला. बंडखोर खासदारांवर संताप व्यक्त करताना राऊतांनी ऑपरेशन तुडवाचा उल्लेख केला होता. यावरुन देखील कदमांनी राऊतांना समाचार घेत, "आम्ही शिवसैनिक आहोत, तुडवायची भाषा कोणाला करताय? हिंमत असेल तर खासदारांच्या केसाला धक्का लावून पाहा. तुमच्या घरात शिवसैनिक शिरतील आणि तोंड बंद करतील, फोडून काढतील", असे कदम म्हणाले.

शिवसेनेच्या वाटचालीतील 57 वर्षाचा मी साक्षीदार, असे म्हणत रामदाम कदमांनी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी शिवसेनेचा जन्म झाल्याचे नमूद केले. उद्धव ठाकरे तुमच्यावर ही वेळ का आली? असा प्रश्न विचारत कदम यांनी आमदार, खासदार गेले उद्या उरलेले आमदार पण जातील, असे वक्तव्य केले. महाराष्ट्राचे खरे टायगर एकनाथ शिंदे असल्याचे मत यावेळी रामदास कदम यांनी व्यक्त केले. दिवगंत बाळासाहेब ठाकरे दोन दोन हातांनी एकनाथ शिंदेंना आशिर्वाद देत असतील, असेही कदम यावेळी म्हणाले.

रामदास कदम यांनी यावेळी ऑपरेशन टायगरबाबत डॉ. श्रीकांत शिंदे यांचे अभिनंदन केले. "श्रीकांत शिंदेंना युवासेनेचे प्रमुख करा, तसेच राष्ट्रीय सरचिटणीस करुन टाका", असा इच्छाही त्यांनी बोलून दाखवली. दित्य ठाकरेंना साहेब म्हणावं लागायचं असेही कदम यावेळी म्हणाले. कदम यांनी राऊतांवर टीका करताना, संजय राऊतांमुळं उद्धव ठाकरेंना अधोगती सुरु झाली आहे, असे वक्तव्य केलं. तसेच, राऊत आमच्या नादी लागू नका असा इशाराही त्यांनी दिला. "एकनाथ शिंदे कोण आहे, ते एक टायगर आहेत. हे महाराष्ट्रात आणि देशात सिद्ध झाले. त्यावेळी ४० रेडे मुंबईत आले तर कापू असा इशारा देण्यात आला पण, आम्ही मुंबईत आलो आणि सत्ता स्थापन केली.

## "स्वाभिमान मेला की उरतात फक्त जिवंत प्रेतं", राज ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई/वृत्तसंस्था**

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या ६ खासदारांनी वेगळा मार्ग निवडला असून, ते लवकरच शिंदेंच्या शिवसेनेत सामील होणार आहेत. शिंदेंच्या शिवसेनेने हे खासदार फोडले असून, त्यांना ५० कोटींना विकत घेतल्याचा दावा ठाकरेसेनेकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना या संपूर्ण प्रकरणाचा खरपूस समाचार घेतला.

राज ठाकरे यांनी आज विविध चालू घडामोडींवर भाष्य केले. तसेच, खासदार फुटीच्या मुद्द्यावरून तीव्र शब्दांत टीका केली. ते म्हणाले, "आपण आपल्या राज्याचं आणि देशाचं काय नुकसान करतोय, याचा विचार करायला हवा. आज बेरोजगारीचे प्रमाण कमालीचे वाढले आहे, त्याकडे आपले लक्ष आहे का? अजून पाऊस पडलेला नाही; महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण होणार आहे, आणि इथे मात्र खासदार फोडण्याचे सत्र सुरू आहे! आमदार आणि नगरसेवक फोडले जात आहेत. आपली सत्ता कशी टिकेल, फक्त याच एका गोष्टीचा विचार सध्या सुरू आहे. यासाठी वाट्टेल तितके पैसे द्यायला हे तयार आहेत आणि माणसेही विकली जात आहेत. मला असे वाटते की, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांपेक्षा आता जनतेनेच याचा



गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. ज्या लोकप्रतिनिधींना निवडून आणण्यासाठी तुम्ही पाच-पाच तास रांगेत उभे राहिलात, तेच लोक जर ५०-१०० कोटींसाठी विकले जात असतील, तर त्यांना तुम्ही पुन्हा उभे करणार का?"

"आता ते जर परत तुमच्याकडे मते मागण्यासाठी आले, तर तुमची प्रतिक्रिया काय असणार? एक जुने प्रसिद्ध वाक्य आहे— 'स्वाभिमान मेला की उरतात फक्त जिवंत प्रेते'; आज देशात ज्या प्रकारचे राजकारण सुरू आहे, ते पाहता आम्ही आमच्या भविष्यातील पिढ्यांना काय सांगणार आहोत? आम्ही विकले गेलो आहोत, हे सांगणार का?" असा संतप्त सवालही राज ठाकरे यांनी उपस्थित केला. देशातील वाढत्या आत्महत्यांवर चिंता व्यक्त करताना ते म्हणाले, "आज देशात आत्महत्यांचे प्रमाण किती वाढले आहे, याची आकडेवारीच समोर आहे. कुठे ११, कुठे ४२, कुठे १०६, तर कुठे ६१५ जणांनी जीव दिलाय. मध्य प्रदेशमध्ये १५ हजार, गुजरातमध्ये ८ हजार आणि दुर्दैवाने सर्वात जास्त म्हणजे २२ हजार १७४ आत्महत्या आपल्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. आज शेतकरी आणि विद्यार्थी आत्महत्या करत आहेत, दुसरीकडे 'NEET' परीक्षेचे पेपर फुटत आहेत. जेव्हा 'NEET' परीक्षा आणली गेली, तेव्हाच मी तिला विरोध केला होता. आज लहान मुलांना पळवण्याचे प्रकारही वाढले आहेत. जसे खासदार-आमदार पळवले जातात, तशाच मुली पळवल्या जात आहेत आणि त्यांचे व्यापार होत आहेत. त्यांना परदेशी किंवा वेश्या व्यवसायात ढकलले जात आहे. पण आपल्याकडे काय चालू आहे?"

# इजिप्तकडून पहिल्या विजयाची नोंद

**वॅंकुव्हर, ब्रिटिश कोलंबिया/वृत्तसंस्था**



मैदानात इजिप्तचे खेळाडू आनंदाने नाचताना आणि स्टेडियममध्ये लाल रंगाचे कपडे परिधान केलेले त्यांचे चाहते जल्लोष करताना पाहायला मिळाले. कारण अखेर इजिप्तच्या संघाला विश्वचषकातील आपला पहिला विजय मिळाला. मोहम्मद सालाहने त्यांना आघाडी मिळवून देणारा गोल केला आणि शेवटी इजिप्तने न्यूझीलंडचा 3-1 असा पराभव केला.

67 व्या मिनिटाला गोल केल्यानंतर सालाहने मूठ उंचावून जल्लोष केला आणि त्यानंतर त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला वेढा घातला. 85 व्या मिनिटाला जेव्हा त्याला मैदानाबाहेर बोलावण्यात आले तेव्हा 'बीसी प्लेस वॅंकुव्हर'मधील खच्चून भरलेल्या प्रेक्षागृहाने उभे राहून त्याचे कौतुक केले. सामना संपल्यावर, प्रशिक्षक होसाम हसन आणि एका साहाय्यकाने इजिप्तचा ध्वज हातात घेतला आणि तो हवेत फडकवत मैदानाभोवती धाव घेतली. सामना संपल्याची अंतिम शिट्टी वाजल्यानंतरही बराच वेळ चाहते जल्लोष करत आणि गाणी गात होते. टिम पेनने हाणलेल्या कॉर्नर किकवर फिन सरमनने हवेत झेप घेत हेडरद्वारे गोल केला आणि 15 व्या मिनिटाला न्यूझीलंडला आघाडी मिळवून दिली. 35 व्या मिनिटाला ओमर मार्मशने सालाहाला फ्री किकवर पास दिला होता. परंतु तो फटका थोडासा बाहेर गेला आणि वळण घेऊन गोलजाळीच्या बाजूच्या भागाला लागला. परिणामी मध्यांतराच्या वेळी इजिप्त 0-1 अशा फरकाने पिछाडीवर होता.

सामन्याच्या उत्तरार्धात इजिप्तने आक्रमकता वाढवली आणि मुस्तफा झिकोने बरोबरी साधणारा गोल केला. त्याने सुरमन आणि पेन यांच्या मधल्या जागेतून हेडरद्वारे गोल केला. न्यूझ"ाlलंडचा गोलरक्षक मॅक्स क्रोकॉम्बेने चेंडूला स्पर्श केला खरा, पण तो गोल रोखू शकला नाही. त्यानंतर सालाहने झिकोकडून मिळालेल्या 'बॅक-हील' पासवर गोल केला. या गोलमुळे राष्ट्रीय संघासाठी सर्वाधिक गोल करण्याच्या बाबतीत आपल्या प्रशिक्षकाची बरोबरी करण्यापासून तो आता केवळ एका गोलने दूर आहे. 82 व्या मिनिटाला ट्रेझेगेटने डायव्हिंग हेडरद्वारे गोल करत इजिप्तच्या गोलांची नोंद पूर्ण केली.

या विजयामुळे इजिप्तचा संघ 'गट जी'मध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे, परंतु बाद फेरीतील त्यांचे स्थान निश्चित झालेले नाही. आता हा संघ सिएटल येथे इराणविरुद्ध निर्णायक सामना खेळेल. पुढील फेरीत जाण्यासाठी त्यांना सदर सामना किमान बरोबरीत सोडवणे आवश्यक आहे. चार वर्षांपूर्वी कतारमधील स्पर्धेला मुकल्यानंतर इजिप्तचा संघ चौथ्यांदा विश्वचषकात सहभागी होत आहे. सालाहने रशियातील 2018 च्या विश्वचषकात दोन गोल केले होते.

# बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप भारतात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**



जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा 17 वर्षांनंतर 17 ते 23 ऑगस्ट दरम्यान हैदराबादमध्ये होणार असून या स्पर्धेत लक्ष्य सेन, पीव्ही सिंधू आणि पुरुष दुहेरीतील जोडी सात्विकसाईराज व चिराग शेट्टी यांसारखे भारताचे आघाडीचे खेळाडू मायदेशात या स्पर्धेत सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ राहणार आहे, तर या स्पर्धेचे तिकिट दर निश्चित करण्यात आले असून किमान तिकीट दर 499 रुपये ठेवण्यात आले आहे.

बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाचे 'बुकमायशो'ची या स्पर्धेसाठी अधिकृत तिकीट विक्री एजन्सी म्हणून घोषणा केली आहे. ही स्पर्धा इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर होणार आहे. सामान्य प्रेक्षकांसाठी सहा वेगवेगळ्या किंमत श्रेणींमध्ये 6000 हून अधिक जागा उपलब्ध असतील. 499 रुपयांच्या सुरुवातीच्या टप्प्यातील तिकिट व्यतिरिक्त, चाहते मर्यादित काळासाठी इतर पाच श्रेणांमध्ये 15 टक्के सवलतीचा लाभ घेऊ शकतात. सामन्यात संपूर्ण अनुभव घेण्यासाठी प्रीमियम आसनव्यवस्थेचे दर 5,500 रुपये निश्चित करण्यात आले आहेत. तिकीट विक्री टप्प्याटप्प्याने सुरु होईल. सुरुवातीला स्पर्धेच्या पहिल्या चार दिवसांची तिकिटे उपलब्ध होतील आणि अंतिम सामन्यापर्यंत विविध श्रेणीचे दर कायम राहतील.

ही जागतिक अजिंक्यपद स्पर्धा 17 वर्षांनंतर भारतात परतत आहे. यापूर्वी 2009 मध्ये हैदराबादने या स्पर्धेचे यजमानपद भूषवले होते. या स्पर्धेत महिला एकेरीतील जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली आन से यंग, चीनच्या शी यू ची आणि ली शी फेंग तसेच इंडोनेशियाची दुहेरीतील जोडी फजर अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिक्री यासारख्या अव्वल दर्जाचे खेळाडू नवी दिल्लीत हजेरी लावणार आहेत. भारतीय बॅडमिंटनसाठी आणि ज्या चाहत्यांनी वर्षानुवर्षे या खेळाच्या प्रगतीला चालना दिली आहे, त्यांच्यासाठी हा एक ऐतिहासिक क्षण असेल, असे बीएआयचे महासचिव संजय मिश्रा म्हणाले.

# मानव सुथारचे कौंटी सामन्यात ७ बळी

**टॉन्टन :** भारताचा नवोदित फिरकी गोलंदाज मानव सुथारने इंग्लीश कौंटी क्रिकेट स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात 7 गडी बाद केले. तो या स्पर्धेत वॉर्विकशायर संघाकडून खेळत आहे. या कौंटीने केवळ दोन सामन्यांसाठी त्याच्याशी करार केला होता. सॉमरसेट आणि वॉर्विकशायर यांच्यातील झालेल्या या सामन्यात मानवने 100 धावांत 5 गडी बाद केले. या स्पर्धेत तो पहिल्यांदाच आपला सहभाग दर्शविला असून त्याने आतापर्यंत या स्पर्धेत दोन सामन्यांत 11 गडी बाद केले आहेत. या स्पर्धेतील यॉर्कशायरविरुद्धच्या पहिल्या सामन्यात मानव सुथारने एकूण 4 गडी बाद केले. भारतीय संघाकडून अफगाणविरुद्ध कसोटी पदार्पण करताना मानव सुथारने 10 गडी बाद केले होते.



# एअर रायफल स्पर्धेत केंद्रेला सुवर्ण

**सुहल, जर्मनी/वृत्तसंस्था**

ज्युनियर नेमबाजी वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारताची दमदार कामगिरी सुरुच असताना किशोरवयीन प्रीतम केंद्रेने पुरुषांच्या 10 मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक जिंकले तर रविवारी महिलांच्या 25 मीटर पिस्तूल सांघिक प्रकारातही भारताने कांस्यपदक मिळवले. या दोन पदकांमुळे भारताची एकूण पदकांची संख्या 11 झाली असून यामध्ये 5 सुवर्णपदकांचा समावेश आहे.

16 वर्षीय प्रीतम केंद्रेने आपल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेत आठ जणांच्या अंतिम फेरीत 251.3 गुण मिळवत न्यूट्रल ॲथलीट टिमोफेई ॲलेनिकोव्ह आणि नॉर्वेच्या जेन्स ओस्टली यांच्यावर मात केली. नुकतीच दहावी बोर्डाची परीक्षा दिलेल्या केंद्रेने सांगितले की, जागतिक विजेतेपद जिंकल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला आहे. आणि आपल्या या जलद प्रगतीचे श्रेय त्याने गगन नारंग यांच्या गन फॉर ग्लोरी शूटिंग अकादमीला दिले. पात्रता फेरीत अनुक्रमे 628.2 आणि 629.0 गुणांसह तिसरे आणि पाचवे स्थान मिळवून केंद्रे आणि त्याचा सहकारी पीयूष शर्मा अंतिम फेरीसाठी पात्र ठरले होते. सुरुवातीला पीयूष



आघाडीवर असला तरी एलिमिनेशन फेरीत केंद्रेने सातत्याने प्रगती केली आणि संयमी कामगिरी करत विजेतेपद निश्चित केले. पीयूषचे पदक थोडक्यात हुकले तो केवळ 0.1 गुणांच्या फरकाने चौथ्या स्थानावर राहिला.

महिलांच्या 25 मी. पिस्तूल सांघिक नेमबाजी भारताच्या अंजली भागवत, परिशा गुप्ता, निखिला ख्रिस्तोफर यांनी 1713 गुण घेत कांस्यपदक मिळविले. न्यूट्रल संघाने यात सुवर्ण व रौप्य मिळविले.

# भारताचा नेदरलॅंड्सवर थरारक विजय

**रॉटरडॅम/वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या प्रो लीग रॉटरडॅम टप्प्यातील रविवारी येथे खेळविण्यात आलेल्या शेवटच्या सामन्यात भारतीय पुरुष हॉकी संघाने नेदरलॅंड्सवर 3-2 अशा गोलफरकाने थरारक विजय नोंदविला.

हा सामना शेवटच्या क्षणापर्यंत चुरशीचा झाला. भारतातर्फे जुगराज सिंगने 18 व्या मिनिटाला, अभिषेकने 27 व्या मिनिटाला तर राजिंदर सिंगने 56 व्या मिनिटाला गोल नोंदविले. रॉटरडॅम टप्प्यातील या हॉकी स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघाने नेदरलॅंड्सवर हा दुसरा निर्णायक विजय मिळविला आहे. रविवारच्या सामन्यात नेदरलॅंड्सतर्फे पेपजीन व्हॅन डेर हिडेनने 19 व्या मिनिटाला तर बिजेनने 59 व्या मिनिटाला गोल केले. या सामन्यात भारतीय संघाचा हंगामी कर्णधार हार्दिक सिंगला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. या सामन्याला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या 15 मिनिटांच्या सत्रात नेदरलॅंड्स संघाने आक्रमक आणि वेगवान खेळावर अधिक भर देत भारताच्या बचावफळीवर चांगलेच दडपण आणले होते. मात्र भारताच्या मध्यफळीने या कालावधीत दर्जेदार कामगिरी केल्याने नेदरलॅंड्सला आपले खाते उघडता आले नाही. सामन्याच्या दुसऱ्या 15 मिनिटांच्या कालावधीत भारताला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि 18 व्या मिनिटाला जुगराज सिंगने नेदरलॅंड्सच्या गोलरक्षक मिजेरला हुलकावणी देत भारताचे खाते उघडले. भारताला ही आघाडी अधिकवेळ राखता आली नाही. 19 व्या मिनिटाला नेदरलॅंड्सला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि त्यांच्या हिडेनने अचूक गोल करून आपल्या संघाला बरोबरी साधून दिली. 27 व्या मिनिटाला जरमनप्रीत सिंगच्या शानदार पासवर अभिषेकने भारताचा दुसरा गोल केला. मध्यंतरापर्यंत भारताने 2-1 अशी आघाडी नेदरलॅंड्सवर मिळविली होती.

सामन्याच्या उत्तरार्धास प्रारंभ झाल्यानंतर 41 व्या मिनिटाला नेदरलॅंड्सला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण भारतीय बचावपटू अमित रोहिदासने नेदरलॅंड्सला गोल करण्यापासून रोखले. सामन्याच्या तिसऱ्या 15 मिनिटांच्या कालावधीअखेर भारताने 2-1 अशी आघाडी मिळविली होती. खेळाच्या शेवटच्या 15 मिनिटांच्या कालावधीत नेदरलॅंड्सने बरोबरी साधण्यासाठी आपल्या डावपेचात सातत्याने बदल केले पण त्यांना यश मिळू शकले नाही. 56 व्या मिनिटाला



दिलप्रीत सिंग आणि मनदीप सिंग यांनी रचलेल्या चालीवर राजिंदर सिंगने भारताचा तिसरा गोल केला. सामना संपण्यास केवळ 1 मिनिट बाकी असताना नेदरलॅंड्सने सलग तीन पेनल्टी कॉर्नर्स मिळविले. यापैकी एका कॉर्नरवर बिजेनने नेदरलॅंड्सचा दुसरा गोल नोंदविला. सामन्याच्या शेवटच्या 10 सेकंदामध्ये भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. पण भारताला या संधीचा लाभ घेता आला नाही. भारताने अखेर हा सामना 3-2 अशा फरकाने जिंकून महत्वाचे तीन गुण मिळविले.

# जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मंजूर विकास कामांच्या गुणवत्तेवर भर द्या तसेच प्रणालीचा १०० टक्के वापर करावा-- पालकमंत्री मकरंद जाधव पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृह येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली. पालकमंत्री दृकश्राव्य माध्यमातून बैठकीला मार्गदर्शन करत होते. यावेळी राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा सहपालकमंत्री संजय सावकारे, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार किरण सरनाईक, चैनसुख संचेती, संजय गायकवाड, श्वेता महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे हे दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खराते, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक जमीर शेख, जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांच्यासह विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ चा आढावा घेण्यात आला. या योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी ५३३ कोटी रुपयांचा मंजूर नियतव्यय असून शासनाकडून ६० टक्के निधी प्राप्त झाला असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. सर्वसाधारण योजनेतील गाभा क्षेत्रासाठी ३५७.२८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी २१४.३७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. सामाजिक व सामूहिक सेवेसाठी २०९.५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय कृषी व संलग्न सेवा क्षेत्रासाठी ५३.३५ कोटी, ग्रामीण विकासासाठी २७.२० कोटी, पाटबंधारे व पूरनियंत्रणासाठी ३२.२२ कोटी आणि ऊर्जा विकासासाठी ३५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बैठकीत जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी घटक कार्यक्रम) सन २०२६-२७ चा देखील आढावा घेण्यात आला. या योजनेसाठी २०.७८ कोटी रुपयांचा मंजूर नियतव्यय असून त्यापैकी १२.४७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. कृषी व संलग्न सेवा, सामाजिक व सामूहिक सेवा, पाटबंधारे व पूरनियंत्रण, परिवहन आणि नाविन्यपूर्ण योजना या क्षेत्रांमध्ये विविध विकासकामे हाती घेण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. तसेच अनुसूचित जाती उपयोजना सन २०२६-२७ अंतर्गत ९९ कोटी रुपयांचा मंजूर नियतव्यय असून त्यापैकी ५९.४० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. कृषी व संलग्न सेवा, सामाजिक व सामुदायिक सेवा, उद्योग व खाणकाम तसेच नाविन्यपूर्ण योजना या क्षेत्रांतील कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्याचे निर्देश पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिले. जिल्हा वार्षिक योजना, जल जीवन मिशन तसेच मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना अंतर्गत सुरू असलेल्या कामांची स्थिती जाणून घेत त्यांनी कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नाला खोलीकरणाच्या कामांना अधिक वेगाने गती देण्याचे निर्देश देत, आवश्यक निधी लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच स्मशानभूमी विकासासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात ज्या गावांमध्ये स्मशानभूमी नाही, त्या गावांमध्ये स्मशानभूमीची




कामे प्राधान्याने घ्यावीत, असे निर्देश पालकमंत्री यांनी दिले. बैठकीत क वर्ग दर्जाच्या तीन तीर्थक्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाल्याची माहिती देण्यात आली. यात बुलढाणा तालुक्यातील रुईखेड टेकाळे येथील दत्त महानुभाव समाजसेवा मंडळ, मेहकर तालुक्यातील शेंदला येथील संत गजानन महाराज संस्थान तसेच खामगाव तालुक्यातील घाटपुरी येथील सद्गुरु श्रीधर महाराज चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या प्रस्तावांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

प्रणालीचा १०० टक्के वापर यंत्रणेने करावा तसेच विहीत मुदतीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घ्यावी. तसेच विकास कामांच्या अंमलबजावणीत गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन यांना प्राधान्य देऊन नागरिकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी यावेळी केले.

# दिव्यांगांसाठी मोफत संगणक व व्यावसायिक प्रशिक्षणाची सुवर्णसंधी प्रवेश प्रक्रिया सुरू....

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे तसेच जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, मिरज येथे सन २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी दिव्यांग युवकांसाठी मोफत संगणकीय व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील दिव्यांगांसाठी मोफत प्रशिक्षण देणारी ही एकमेव शासकीय संस्था असून, संस्थेला अखिल भारतीय स्तरावरील प्रतिष्ठेचा ह्नफिक्की अवॉर्ड १९९९फ प्राप्त झाला आहे. संस्थेमध्ये सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस तसेच मोटार अँड आर्मेचर वायंडिंग व सबमर्सिबल पंप (सिंगल फेज) हे एक वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची या अभ्यासक्रमांना मान्यता आहे. प्रवेशासाठी अर्जदाराचे वय १६ ते ४० वर्षांदरम्यान असणे आवश्यक असून, प्रवेश फक्त दिव्यांग मुलांसाठी उपलब्ध आहे. संगणक अभ्यासक्रमासाठी किमान आठवी उत्तीर्ण तर इलेक्ट्रिक अभ्यासक्रमासाठी किमान नववी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींना राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची संपूर्ण मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय अद्ययावत संगणक प्रयोगशाळा, इंटरनेट सुविधा, भरपूर प्रात्यक्षिक प्रशिक्षण, अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तसेच स्वयंरोजगारासाठी समाज कल्याण विभागाच्या बीजभांडवल योजनेचा लाभ मिळण्याची संधी उपलब्ध आहे. प्रवेश अर्ज व माहितीपत्रक शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, मिरज (जि. सांगली) येथे मोफत




उपलब्ध आहेत. अर्ज पोस्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष संस्थेत जमा करता येतील. अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका, अपंगत्व प्रमाणपत्र, आधार कार्ड, यूडीआयडी कार्ड, अधिवास प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला यांच्या छायाप्रती जोडणे आवश्यक आहे. मर्यादित जागा उपलब्ध असल्याने पात्र दिव्यांग युवकांनी त्वरीत अर्ज करावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांनी आपल्या परिसरातील गरजू दिव्यांग बांधवांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवून त्यांना लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# बुलढाणा शहरात २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम



**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय पल्स पोलिओ कार्यक्रमांतर्गत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी बुलढाणा शहरात विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेद्वारे ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस पाजण्यात येणार आहे. मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी बुलढाणा शहर परिसरात एकूण ३६ पोलिओ लसीकरण बूथ उभारण्यात आले आहेत. पालकांनी आपल्या परिसरातील जवळच्या बूथवर बालकांना घेऊन जाऊन पोलिओचा डोस पाजावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय बुलढाणा यांनी केले आहे. पोलिओसारख्या गंभीर आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत लसीकरण पोहोचणे आवश्यक असल्याने कोणतेही मूल या मोहिमेपासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले आहे. आरोग्य विभागाच्या या राष्ट्रीय उपक्रमात पालकांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या पाल्यांना पोलिओ प्रतिबंधक डोस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# १८ वर्षीय युवती बेपत्ता; बोराखेडी पोलिसात हरवल्याची नोंद

**जनसंचलन-मोताळा**

घरातून कोणालाही न सांगता १८ वर्षीय युवती बेपत्ता झाल्याची घटना नांदुरा तालुक्यातील एका गावात उघडकीस आली आहे. याप्रकरणी बोराखेडी पोलिस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, युवतीच्या २१ वर्षीय भावाने याबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, २१ जून रोजी रात्री कुटुंबीय जेवणानंतर घराच्या गच्चीवर झोपले होते. पाऊस २२ जून रोजी युवती घरात नसल्याचे निदर्शनास आले सुरू झाल्याने सर्वजण घरात येऊन




झोपले. मध्यरात्री सुमारे दीड वाजता फिर्यादीला जाग आली असता त्याची बहीण घरातच झोपलेली होती. मात्र दुसऱ्या दिवशी, २२ जून रोजी पहाटे सुमारे पाच वाजता आईने युवती पलंगावर नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर कुटुंबीयांनी घर परिसर, नातेवाईक तसेच इतर ठिकाणी शोध घेतला. मात्र युवतीचा कुठेही ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे ती घरातून निघून गेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. बेपत्ता युवतीचा रंग सावळा, उंची सुमारे पाच फ ूट असून ती घरातून निघून गेली.

# एकल महिला धोरणासाठी ३० जूनला जिल्हास्तरीय बैठक; सूचना व अभिप्राय मागविले

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र आणि व्यापक ङ्गएकल महिला धोरणफ तयार करत आहे. या धोरणाला अधिक परिणामकारक व लोकाभिमुख स्वरूप देण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने ३० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत एकल महिलांच्या समस्या, अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञांनी या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. धोरणाचा मसुदा तयार करताना केवळ समस्या मांडण्याऐवजी त्यावरील ठोस उपाय, नवीन योजना, विद्यमान योजनांमधील आवश्यक बदल तसेच कायदे किंवा नियमांमधील सुधारणा याबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रस्तावामध्ये संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि त्याचे परिणाम यांचा समावेश असावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांसाठी प्रशासनाने ८२०८५८९१९५ हा अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. या क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या नाविन्यपूर्ण सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाच्या मसुदा तयार करताना विचार केला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित घटकांनी या महत्वपूर्ण उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

# सद्भावना सेवा समितीच्यावतीने आयोजित... श्री खाटुशामजी रेल्वे यात्रेत सहभागी व्हा..- राधेश्याम चांडक

**जनसंचलन-बुलडाणा**

बुलडाणा वासियांच्या विशेष आग्रहास्तव सद्भावना सेवा समितीने दि. ३० ऑगस्ट ते दि. ०५ सप्टेंबर पर्यंत खाटुशाम येथे दर्शनासाठी रेल्वे यात्रा व भागवत कथेचे आयोजन केले आहे. पांडुपुत्र बलाढ्य भिम आणि भिमाचा पुत्र घटोत्कच आणि घटोत्कचचा पुत्र बार्बरीकने शिवाची कठोर तपस्या केली होती. शिवाने प्रसन्न होवून बार्बरीकला तीन बाण दिले या बाणांनी संपुर्ण पृथ्वीचा विनाश होईल एवढी शक्ती होती. आईचा आशिर्वाद घेतांना वचन दिले होते की, जो हारेल त्याच्या बाजुने लढेल असे वचन बार्बरीकने दिले. कौरव-पांडवांच्या लढाईकडे बार्बरीक येत असतांना श्रीकृष्णाची भेट झाली, श्रीकृष्णाने बार्बरीकची शक्ती ओळखली व बाणाचा उपयोग केला तर पांडव व कौरव सहीत संपुर्ण पृथ्वीचा विनाश होईल, श्रीकृष्णाने चतुराई केली बार्बरीकचे शिर बलीदान मागीतले. बार्बरीकने कौरव-पांडवांचे युध्द बघण्याची इच्छा व्यक्त केली. श्रीकृष्णाने ती इच्छा पुर्ण केली, हे पवित्र शिर सिकर जिल्ह्यात खाटु येथे आहे. पवित्र शामकुंड येथेच आहे आणि बार्बरीकचे धड रिंगस येथे आहे. रिंगस वरुन खाटुशामला पताका घेवून भाविक पायी जातात. श्रीकृष्णाने बार्बरीकला आशिर्वाद दिले की, कलीयुगात श्रीकृष्णाचा अवतार म्हणुन खाटुशाम म्हणुन ओळखले जाईल व येथे येणाऱ्या प्रत्येक भक्तांची मनोकामना पुर्ण होईल अश्या पवित्र तिर्थस्थानी सर्वांनी या यात्रेत सहभागी व्हावे असे कळकळीचे आवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले. भाईजींमुळे बुलडाणावाशीयांना अध्यात्मिक सत्संगाचा लाभ होत आहे. म्हणुन भाईजींच्या आरोग्यासाठी अनेक स्त्री-पुरुष खाटुशाम यात्रेत सहभागी झाले आहेत. खाटुशामला हे भक्त जप आणि प्रार्थना भाईजींच्या उत्तम आरोग्यासाठी करणार आहेत. भक्तांची श्रध्दा आहे की, श्री खाटुशामजी आपली मनोकामना पुर्ण करतील. श्री खाटुशामजी येथे सद्भावना सेवा समितीने जय्यत तयारी केली आहे. भोजन व निवास व्यवस्था उत्तम दर्जाची आहे. कथा यशस्वी होण्यासाठी राधेश्याम चांडक, राजेश देशलहरा, चंपालाल



शर्मा, प्रकाशचंद्र पाठक, तिलोकचंद चांडक, सिध्दार्थ शर्मा मुख्य यजमान सुरेशचंद्र गट्टाणी व सौ. सरला गट्टाणी, उमेश मुंदडा, विजय व्यवहारे, सुभाष दर्डा, सौ. अंजली परांजपे, सौ. माधुरी घोरपडे, मधुकर गायके, बाळु घीवे, पुरणमल शर्मा, बबन परांजपे, मनमोहन शर्मा, लाला माधवाणी, भुपेंद्र भट व अनेक सहकारी प्रयत्न करीत आहे. श्री खाटुशामजीच्या पावन भुमीवर व पवित्र वातावरणात अध्यात्मिक सत्संग प्राप्त करुन आपल्या मनोकामना पुर्ण करा असे भावपुर्ण आवाहन भाईजींनी केले. या यात्रेच्या संपर्कासाठी चंपालाल शर्मा मो. नं. ९८२२२२२२०६ या नंबरवर मार्बल हाऊस, स्टेट बँकेच्या मागे भेट द्यावी.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बुलढाणा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना १० जून २०२६ पासून ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज भरता येत आहेत. शालेय विभाग, कनिष्ठ महाविद्यालय विभाग तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करावेत. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतिगृह कार्यालयात ऑफलाइन स्वरूपात जमा करणे बंधनकारक आहे.



वसतिगृहातील उपलब्ध रिक्त जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल एस. ई. गारमोडे यांनी केले आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बुलढाणा कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८